# वर्धा जिल्हा पोलीस वार्तापत्र

दिनांक : 02.12.2018

## फेसबूकचे गुन्हयात आरोपी अटक बाबत

हकिकत या प्रमाणे आहे की, दिनांक 20.09.2018 रोजी फिर्यादी यांनी पो.स्टे.ला तक्रार दिली की, कुणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे नावाने फेसबूक अकाऊंट तयार करून फेसबूक अकाऊंटवर बदनामीच्या उददेशाने इलेक्ट्रॉनिक साहीत्याच्या साहाय्याने अश्लील छायाचित्र प्रसारीत करून फिर्यादीचे सामाजिक प्रतिष्ठेला इजा पोहचविली व त्याची सामाजीक बदनामी केल्याचे लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे. रामनगर येथे अप. क्र. 708/2018 कलम 354(ड), 501 भादंवि सहकलम 67 माहिती तंत्रज्ञान कायदा (सुधारीत) सन 2008 अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर तपास तांत्रीक स्वरूपाचा असल्याने त्याचा तपास सायबर सेल, वर्धा तर्फे करण्यात आला असून अज्ञात आरोपीने फेसबुक अकाऊंट चालवितांना वापरलेल्या सर्व तांत्रीक सेवा पुरविणा–या कपन्यांकडून सातत्याने पाठपूरावा करून फेसबुक व आयडीया कंपनी यांच्यातर्फे माहिती प्राप्त करण्यात आली. त्यावर वरून सदर फेसबुक अकाऊंट हे नागपुर येथील श्रिकांत उकीनकर नावाचा व्यक्ती वापरीत असल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न झाले. सदर प्रकरणाचा पुढील तपास करण्याकरीता पोलीस निरीक्षक, निलेश एम. ब्राम्हणे, स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांनी एक विशेष पथक तयार करून जिल्हा नागपूर येथे पाठविले. सदर पथकाने आरोपीचा शोध तो काम करीत असलेल्या कन्स्ट्रशन कंपीनीच्या कार्यालयात तसेच त्याचे राहते ठिकाणी घेतला असता तो त्याचे काम करीत असलेल्या कार्यालयात मिळून आला. सदर आरोपी विचारपुस दरम्यान कोणतीही कबुली देत नसुन गुन्हा त्याने केलाच नाही अशा आवेशात होता. परंतु पोलीसोबत असलेल्या सायबर टिमने त्याचे मोबाईल, गुगल अकाउंट, यांची पाहणी करून विवादास्पद फोटो त्याचे मोबाईल व गुगल अकाऊंट वर असल्याचे निष्पन्न केले व या तांत्रीक पुराव्यांच्या आधारे आरोपीने हा गुन्हा केल्याचे तपास पथकास पटवून दिले. यावरून आरोपी नामे श्रीकांत उर्फ स्वीकार कैलासराव उकीनकर, वय 27 वर्ष, रा. रामनगर, तेलंगखेडी ता. जि. नागपूर यांस ताब्यात घेवनू त्याने गुन्हयात वापरलेला MI कंपनीचा मोबाईल कि. 10,000/–रू. जप्त करण्यात आला. आरोपीस पुढील तपासकामी पोलीस स्टेशन रामनगर, जिल्हा वर्धा यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.स्टे. रामनगर करीत आहे.

सदर गुन्हयातील आरोपीने गुन्हा करण्याकरीता फिर्यादी तसेच तिचे पतीच्या व्हॉट्स ॲप व फेसबुक अकाऊंट वरून फिर्यादीचे फोटो कॉपी करून गुन्हयात वापरले. तरी सोशल मिडीयाचा वापर करताना आपल्या अकाऊंटची प्रायव्हसी सेटींग करून घ्यावी. असे आव्हान सायबर सेल, वर्धा तर्फे जनतेस करण्यात येत आहे.

सदर कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक श्री. निखील पिंगळे, उपविभागीय पोलीस अधीकारी श्री. दिनेशकूमार कोल्हे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. निलेश एम. ब्राम्हणे, स्था.गु.शा., वर्धा, पोलीस निरीक्षक, अशोक चौधरी पो.स्टे. रामनगर, पोलीस निरीक्षक, चंद्रकांत मदने, पो.स्टे. वर्धा शहर यांचे निर्देशाप्रमाणे सपोनि. श्रीमती निर्मला किन्नाके, पोहवा सलाम कुरेशी, स्वप्नील भारद्वाज, नापोशि कुलदिप टांकसाळे, अक्षय राऊत, दिनेश बोथकर, लोभेश गाढवे, निलेश कट्टोजवार, अनुप कावळे, जगदीश डफ, पोशी. अभिजीत वाघमारे, प्रदिप वाघ यांनी केली.